REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख ३० नोव्हेंबर, १९३८ | अंक ४७

सर्वांगीण प्रगति
सन १९३७ भक्कम भरभराटीचें वर्ष
वेस्टर्न इंडिया
लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड
सातारा शहर

१९३८ अखेर
आठवें मूल्यमापन
आणि
रौप्य महोत्सव

त्रैवार्षिक बोनस
हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०
कोणत्याही दृष्टीनें पहा
वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.
पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.

स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.
कॉमनवेल्थ विमा कंपनी
लिमिटेड, पुणें.
ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.
ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.
रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंट.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

# विविध माहिती

### परराष्ट्रांतील उत्पन्नावर कर—मेमन लोकांची तक्रार

जपान, जावा, स्ट्रेट सेटलमेंट्स, सयाम, आफ्रिका, इराक, अरबस्तान, इत्यादि ठिकाणीं व्यापार करणाऱ्या हिंदी मेमन लोकांची संख्या सुमारें १५ हजार आहे. इनकम टॅक्स बिलांतील योजनेनुसार त्यांवर कराचा नवीन भार पडणार आहे, त्याविरुद्ध खटपट करण्याकरितां मुंबईच्या मेमन चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रतिनिधी दिल्लीस गेले आहेत.

### कापडाच्या ताग्यांवरील नंबर

कापडाच्या ताग्यावर हिंदी गिरण्या नंबर छापतात आणि कित्येक वेळीं हलक्या प्रतीच्या कापडावरहि दुसऱ्या गिरणीच्या भारी कापडाचा नंबर उठविण्यांत येतो. त्यामुळें गिऱ्हाइकाची फसगत होते. अहमदाबाद येथील गिरणी-मालक संघानें ह्या सर्व नंबरांची छाननी करून त्याबाबत फसवणूक होऊं नये अशी व्यवस्था करण्याचें योजिलें आहे.

### औद्योगिक अल्कोहोल

अल्कोहोलचा उपयोग मुख्यत: पेय म्हणूनच आजवर होत असे, परंतु गेल्या दहा वर्षांत त्याचे अनेक औद्योगिक उपयोग निदर्शनास आले आहेत. स्कॉटलंडमधील डिस्टिलरींतून व्हिस्कीचें उत्पादन होतें; इंग्लंडमधील बहुतेक सर्व उत्पादन औद्योगिक उपयोगाच्या अल्कोहोलचें असतें.

### बी. एस. ए. कंपनी

मोटारी, मोटार-सायकली, सायकली, बंदुका इत्यादींचें उत्पादन करणाऱ्या सुप्रसिद्ध बी. एस. ए. कंपनीस गेल्या वर्षी ८२ लक्ष रुपये नफा झाला. ग्रेटब्रिटनच्या राजेसाहेबांनीं कंपनीची "डॅम्लर" मोटार विकत घेतली.

### "ॲगमार्क" मोसंबीं

सरकारी देखरेखीखालील "ॲगमार्क" लेबलाच्या तुपासंबंधीं माहिती "अर्था"मध्यें नुकतीच येऊन गेली आहे. त्याच धर्तीवर मोसंब्यांची प्रतवारी लावण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यांत राहुरी येथें एक केंद्र उघडण्यांत आलें आहे. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रतीच्या मोसंब्यांच्या पेट्यांस अनुक्रमें तांबडीं, निळीं आणि पिवळीं 'ॲगमॉर्क' लेबलें लावण्याची तेथें व्यवस्था झाली आहे.

### हिंद-ब्रिटन व्यापारी करार

"हिंद-ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटी आतां संपत आल्या असून प्रत्यक्ष बोलणीं लवकरच पुन: सुरु होतील अशी अपेक्षा आहे" असें मि. ऑलिव्हर स्टॅन्ले, प्रेसिडेंट ऑफ दि बोर्ड ऑफ ट्रेड, ह्यांनीं ब्रिटिश पार्लमेंटमध्यें सांगितलें.

### जप्त जमिनी परत देणाऱ्या बिलास मंजुरी

गेल्या कायदेभंगाच्या चळवळींत जप्त झालेल्या जमिनी त्यांच्या मूळ मालकास परत मिळवून देणारें बिल मुंबई विधिमंडळानें पास केलें होतें, त्यास गव्हर्नर जनरलनें मंजुरी दिली आहे.

### रेल्वे प्रवासाच्या सुरक्षितपणाविषयीं गैरविश्वास

"गेल्या अठरा महिन्यांत हिंदी आगगाड्यांस जे अपघात झाले आणि त्यांत जी प्राणहानि झाली, त्यामुळें रेल्वेवरील प्रवासाच्या सुरक्षितपणाविषयीं उत्पन्न झालेला गैरविश्वास दूर करण्याचा यत्न करणें आवश्यक आहे" असें हिंदुस्थान सरकारच्या वहातुक खात्याचे प्रमुख, सर टॉमस स्टुअर्ट, ह्यांनीं आपल्या एका भाषणांत सांगितलें.

### हिंदुस्थान सरकारचें तारखातें

हिंदुस्थान सरकारच्या तार खात्यास गेल्या वर्षी १६ लक्ष, २९ हजार रुपये नुकसान आलें. वर्तमानपत्रांच्या तारांस सवलतीचे दर आकारण्यांत येतात त्यामुळें झालेल्या नुकसानीचा आकडा ८$\frac{3}{4}$ लक्ष रुपये भरला.

### विमानविद्या शिकण्याची सोय

ब्रिटिश हिंदुस्थानांत कराची, मुंबई, मद्रास, कलकत्ता, कानपूर, दिल्ली आणि लाहोर ह्या सात ठिकाणीं आणि संस्थानी मुलुखांत जोधपूर, हैद्राबाद आणि जयपूर येथें विमानविद्या शिकण्याची सोय आहे.

### विमानाचे सारथी

ऑक्टोबर, १९३८ अखेर एकूण ५५२ हिंदी उमेदवारांनीं विमान चालविण्याचा शिक्षणक्रम ब्रिटिश हिंदुस्थानांत पुरा केला आहे.

### पोर्ट ट्रस्ट्सवरील युरोपियन प्रतिनिधी

पोर्ट ट्रस्ट्सवर सर्व तऱ्हेच्या हितसंबंधांस प्रतिनिधित्व देण्याचें हिंदुस्थान सरकारचें धोरण आहे, असें सर टॉमस स्टुअर्ट ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत सांगितलें. "ह्या संस्थांतून ब्रिटिशांचें मताधिक्य आहे, ह्यास अनुसरून जर्मनी, इटालियन अगर जर्मन प्रतिनिधी त्यांत घेण्यास प्रत्यवाय नाहीं, ही परिस्थिति सरकारनें विचारांत घेतली आहे काय ?" ह्या प्रश्नास उत्तर देतांना वरील धोरणाचाच पुनरुच्चार झाला.

### रबराचे ४० हजार उपयोग

रबराचे निरनिराळे ४० हजार उपयोग आहेत. विजेच्या धंद्यांत रबराचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो. मोटारींच्या टायर्स आणि त्यांतील ट्यूब्स ह्यांसाठी रबरास सर्वांत मोठी मागणी असते.

### सिलोनमधील खनिज पदार्थांची पहाणी

सिलोनमधील खनिज पदार्थांची पहाणी करण्याचें काम मि. डी. के. वाडिया ह्यांजकडे सोपविण्यांत आलें असून ते तीन वर्षांच्या नोकरीच्या करारानें तेथें गेले आहेत.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ७ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २$\frac{1}{2}$ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ७ आ. ९ पै इतका पडला.

### रुमानियन गव्हाची खरेदी

ब्रिटिश सरकारनें रुमानियाकडून १$\frac{1}{4}$ कोटि रुपये किंमतीचा २ लक्ष टन गहूं नुकताच खरेदी केला आहे. ब्रिटिश माल घेणाऱ्या रुमानियन व्यापाऱ्यांस ग्रेट ब्रिटनमध्यें पैसे पोंचते करण्यास त्यामुळें साधन उपलब्ध झालें असल्याकारणानें रुमानियाशीं व्यवहार करणाऱ्या ब्रिटिश व्यापाऱ्यांची आतां सोय झाली आहे.

### लंडन शहरांतील सिनेमा शोकी

लंडन शहराची लोकवस्ति एक कोटिपेक्षा कमी आहे, तथापि त्या शहराच्या एकट्या वेस्ट एन्ड भागांतीलच सिनेमांचीं आणि नाटकगृहांचीं दरसाल चार कोटि तिकिटें खपतात आणि निदान २४ कोटि तिकिटांची विक्री इतर भागांतील सिनेमांत आणि नाटकगृहांत होते.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| १३-११-३८ ते १९-११-३८ | २२,२३,४९७ |
| २०-११-३८ ते २६-११-३८ | ९,४९,८७३ |
| २१-९-३१ ते २६-११-३८ | ३,२२,०५,७५,४६४ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... ५८२ |
| २ ताग-गोणपाट ह्यांचा धंदा | ५८३ |
| ३ हिंदुस्थानांतील सरकारी वरिष्ठ नोकऱ्या | ... ५८४ |
| ४ स्फुट विचार | ... ५८५ |
| इन्कमटॅक्स बिल– फ्रान्समधील गंभीर परिस्थिति– सहकारी संस्थांतील कर्जदार आणि जामीनदार–हिंदी मिठाचा धंदा– ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका ह्यांचेमधील करार | |
| ५ कॉमनवेल्थ विमा कं.लि. | ५८७ |
| ६ बॉंबे प्रॉ. को. बँक, धुळें | ५८७ |
| ७ एका नमुनेदार खेडेगांवाचें दृश्य | ... ५८८ |
| ८ आयरिश विमा कंपन्यांचें एकत्रीकरण | ... ५८८ |
| ९ इंग्लंडमधील उच्च रहाणी | ५८८ |
| १० स्वित्सरलंडमधील प्रवासी आकर्षण्याचा धंदा | ... ५८९ |
| ११ सांगली स्टेट सें. को. बँक लि. | ... ५८९ |
| १२ फंडगुंडांच्या फसवेगिरीवर मोहीम | ... ५९० |
| १३ निवडक बाजारभाव | ... ५९१ |


# अर्थ

बुधवार, ता. ३० नोव्हेंबर, १९३८

## ताग–गोणपाट ह्यांचा धंदा

### हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन येथील परिस्थिति

तागाचें उत्पादन हिंदुस्थानांत बंगाल, बिहार व आसाम ह्या प्रांतांत विशेष रीतीनें होतें आणि त्यास सर्व जगभर मागणी असते. तागाची लागवड जगांत इतरत्र होत नसल्यानें ह्या बाबतींत हिंदुस्थानास एक प्रकारची मक्तेदारी प्राप्त झाली आहे. गोणपाटाचा उपयोग अनेक जातींच्या मालाची साठवण आणि नेआण करण्याकडे मोठ्या प्रमाणांत होतो. त्याची जागा दुसऱ्या कोणत्या तरी मालानें भरून काढून हिंदुस्थानाची तागाचे संबंधांतली मक्तेदारी हाणून पाडावी ह्या उद्देशानें ह्या देशाचे बाहेर प्रयत्न झाले आहेत आणि चालले आहेत. परंतु त्यांना हिंदुस्थानाच्या सुदैवानें अजून म्हणण्यासारखें यश आलेलें नाहीं. तथापि, अलीकडील आर्थिक मंदीमुळें गोणपाटाच्या किंमती बेसुमार उतरून तागाचें उत्पादन करणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांचें विलक्षण नुकसान झालें आहे. तागाच्या लागवडीचें क्षेत्र मर्यादित करण्याची खटपट बंगालमध्यें करण्यांत आली असतां ह्या प्रकारचें सामुदायिक नियंत्रण स्थानिक परिस्थितीमुळें बहुतेक अव्यवहार्य झालें आहे. हुगळी नदीवर तागाचे कारखाने आहेत त्याच्या मालकांचें एकमत न झाल्यानें त्यांतलें उत्पादन मर्यादित होण्याचे मार्गांत अडचण उपस्थित झाली होती. ती सरकार मध्यें पडल्या कारणानें नुकतीच दूर झाली आहे. तथापि तागाचे बाजारभाव म्हणण्यासारखे न सुधारल्यानें शेतकऱ्यांची हलाखी कायमच आहे. तागाच्या लागवडीचें हिंदुस्थानांतील क्षेत्र आणि त्याचें उत्पादन ह्यांचे आकडे खाली दिले आहेत. त्याचेच खाली कच्च्या व पक्क्या तागाच्या निर्गतीचे आकडे दिले आहेत.

#### हिंदी ताग

| | १९३०-३१ | १९३४-३५ | १९३६-३७ | १९३७-३८ |
|---|---|---|---|---|
| क्षेत्र ( लक्ष एकर ) | ३५ | २६ | २९ | २८ |
| उत्पादन ( लक्ष टन ) | २० | १५ | १७ | १५ |

#### हिंदी तागाची निर्गत

| | १९३० | १९३४ | १९३६ | १९३७ |
|---|---|---|---|---|
| कच्चा ताग ( लक्ष टन ) | ६¼ | ७¼ | ७½ | ८¼ |
| पक्का ताग ( „ „ ) | ८½ | ६½ | ९ | १०¼ |

हुगळी नदीवरील तागाच्या गिरण्यांत कच्चा तागाची साठवण ८ ते १० लक्ष टन इतकी असते. हिंदी तागाच्या उत्पादनांतलें निम्में उत्पादन त्यांच्यामध्यें दर वर्षी खपतें. गेल्या वर्षी पक्क्या मालाचें त्यांचें उत्पादन १२¾ लक्ष टन इतकें भरलें. त्यांतल्या एक पंचमांशाचा देशांतल्या देशांत खप होतो. ह्या गिरण्यांची संख्या ८२ असून त्यांमध्यें ६६,००० माग आहेत.त्यांपैकी ७१ कारखाने बंगालमध्यें आहेत आणि त्यांतल्या मागांची संख्या ६३,००० एवढी आहे. गिरणी मालकांत कामाचे तास कमी करणें आणि उत्पादन मर्यादित करणें ह्यांचे संबंधांत मतभेद झाल्यानें पक्क्या मालाचा उठाव होऊं शकला नाहीं. ह्या धंद्यांत गेल्या सालीं कामकऱ्यांचे संपहि अनेक झाले आणि एकूण ४९ लक्ष इतके कामाचे दिवस वांया गेले.

स्कॉटलंडमध्यें डंडी येथें तागाच्या गिरण्या शंभर वर्षीमागें निघाल्या आणि तेथील स्कॉच लोकांनीं हुगळीनदीच्या तीरावर कारखाने उभारले. स्कॉटिश गिरण्या हिंदी कच्चा तागावर अवलंबून असल्यानें त्यांस बंगालमधील त्यांच्याच बांधवांनीं चालवलेल्या कारखान्यांची स्पर्धा बाधक होत राहिली आहे. ग्रेटब्रिटनप्रमाणें अमेरिका, जर्मनी, इटली, फ्रान्स वगैरे देश हिंदी कच्चा तागा घेतात आणि त्याचा पक्का माल बनवतात. अलीकडे डंडीच्या कारखान्यांची स्थिति थोडीशी सुधारली आहे. त्यांचें उत्पादन आणि मालाची निर्गत हीं हळुहळु वाढलीं आहेत. तथापि त्या धंद्यांत बेकारी बरीच आहे आणि हिंदुस्थानांतल्या गिरण्यांची आपणांस सोसावी लागणारी स्पर्धा व्यापारी कराराचे द्वारें नियंत्रित व्हावी अशी ब्रिटिश कारखानदारांची मागणी आहे. तिला अर्थातच हुगळीच्या काठावरचे कारखानदार जोराचा विरोध करीत आहेत. ब्रिटिश सरकार डंडीच्या कारखान्यांस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें सहाय देत आहे. परदेशांनीं डंडीचा माल विशिष्ट प्रमाणांत घेतलाच पाहिजे अशी अट त्यांच्याशीं होणाऱ्या व्यापारी करारांत समाविष्ट करण्यांत येत आहे. राष्ट्रसंरक्षणासाठीं अलीकडे ब्रिटिश सरकारनें तीन कोटि वाळूचीं पोतीं डंडीच्या कारखानदारांकडून खरेदी केलीं असून आणखी २७½ कोटि पोत्यांच्या खरेदीचा करार त्यांच्याशीं केला आहे. तागाच्या मालाचा उपयोग निरनिराळ्या पदार्थांच्या बनावटीकडे करण्याची प्रवृत्ति वाढत आहे आणि त्या दिशेनें आपल्या मालाचा खप वाढवून आणण्याचे प्रयत्न ब्रिटिश कारखानदारांस करावे लागतील. हिंदुस्थानांतील गिरणीवाल्यांसहि तिकडे लक्ष पुरवावें लागेल.

---

### जगांतील सर्वांत उंच इमारत

जगांतील सर्वांत उंच इमारत न्यूयॉर्कमध्यें आहे. त्या इमारतीचें नांव "एम्पायर स्टेट बिल्डिंग" असें असून तिची उंची १,२४८ फूट आहे.

---

### दरसाल ५५ हजार पासबुकें गहाळ

ग्रेट ब्रिटनमध्यें १ कोटि, १० लक्ष लोकांचीं पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँकेंत खातीं आहेत. त्यांपैकीं दरसाल ५५ हजार लोकांचीं पासबुकें गहाळ होतात.

## हिंदुस्थानांतील सरकारी वरिष्ठ नोकऱ्या

हिंदी कामगारांसंबंधीं प्रश्नांची अभ्यासपूर्वक चर्चा करणारीं चार पत्रकें इंडियन मर्चंट्स चेंबरनें ह्यापूर्वी प्रसिद्ध केलीं आणि आतां 'सरकारी अधिकारी वर्गाचें हिंदीकरण' ह्या विषयावरील पत्रक तिनें प्रसिद्ध केलें आहे. सन १८३३ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीनें, आपल्या अधिकाराखालील नोकऱ्यांत सर्वांस घेतलें जाईल, हिंदी लोकांस कोणत्याहि निमित्तानें आडकाठी केली जाणार नाहीं, असें जाहीर केलें. ह्या वर्षापासूनच हिंदी लोकांस कंपनीचे पदरीं आणि नंतर पुढें हिंदुस्थान सरकारचे हाताखाली नोकरींचे बाबतींत समानतेचा दर्जा प्राप्त झाला. १८५४ सालीं उच्च दर्जाच्या परीक्षांस बसण्याची हिंदी लोकांस मुभा मिळाली. १८५८ सालच्या राणीच्या सुप्रसिद्ध जाहीरनाम्यानें हिंदी लोकांच्या आकांक्षा तृप्त होतील अशी घोषणा केली. तथापि, सरकारनें हें धोरण उत्साहानें आचरणांत आणलेलें दिसत नाहीं. १८८७ साल अखेर फक्त अकराच हिंदी उमेदवारांचा सनदी नोकरींत प्रवेश होऊं शकला. त्या वर्षी ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सरकारनें एक कमिशन नेमलें, परंतु त्या कमिशनच्या शिफारसी अंमलांत आणण्याचें काम भारतमंत्र्यांनीं केलें नाहीं. १९१२ सालीं इस्लिंग्टन कमिशननें ह्याच प्रश्नाचा पुनः विचार केला. १८८७ ते १९१३ ह्या मुदतीमध्यें हिंदीकरणाची प्रगति किती मंद गतीनें झाली, हें खालील तक्त्यावरून समजून येईलः—

### हिंदीकरणाची मंद प्रगति

| २०० रुपये पगारावरील अधिकारीः— | युरोपियन आणि अँग्लो-इंडियन | हिंदी आणि ब्रह्मी | एकूण | हिंदी आणि ब्रह्मी ह्यांचें प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| १८८७ | ५,८३७ | ३,००३ | ८,८४० | ३४ |
| १९१३ | ६,४९१ | ४,५७३ | ११,०६४ | ४२ |
| ५०० रुपये पगारावरील अधिकारीः— | | | | |
| १८८७ | ३,२४६ | ४२७ | ३,६७३ | १२ |
| १९१३ | ४,०४२ | ९४२ | ४,९८४ | .१९ |
| ८०० रुपये पगारावरील अधिकारीः- | | | | |
| १८८७ | १,६४४ | ७७ | १,७२१ | ४ |
| १९१३ | २,२५९ | २४२ | २,५०१ | १० |

१८६७ सालीं, एक हजार रुपये पगारावरील ६४८ नोकऱ्यांपैकीं १२ नोकऱ्या हिंदी लोकांच्या वाट्यास आल्या होत्या. १९०३ सालीं, अशा १,३७० नोकऱ्यांपैकी ९२ नोकऱ्यांवर हिंदी लोक होते. १९१० सालीं हेच आकडे अनुक्रमें १,८८२ आणि १६१ असे होते. म्हणजे, ४३ वर्षांचे अवधींत हिंदी नोकरांच्या प्रमाणांत शेकडा २ पासून ८.६ पर्यंत वाढ झाली, असा हिशेब होतो. ह्या असमाधानकारक परिस्थितीविरुद्ध हिंदुस्थानांत बरीच ओरड झाली आणि १९११ सालीं व्हाइसरॉयच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें ना. सुब्बराव ह्यांनीं एक ठराव मांडून ह्या प्रश्नाकडे सरकारचें लक्ष वेधलें. त्यास अनुसरून १९१२ सालीं इस्लिंग्टन कमिशनची नेमणूक सरकारनें जाहीर केली. कमिशनच्या सभासदांनीं १९१५ मध्यें रिपोर्टावर सह्या केल्या; परंतु महायुद्धाच्या गडबडीमुळें रिपोर्टाचें प्रसिद्धीकरण १९१७ पर्यंत लांबणीवर पडलें. इस्लिंग्टन कमिशनच्या रिपोर्टावर साधक बाधक चर्चा होण्यापूर्वीच भारतमंत्रि, मि. मॉंटेग्यू, ह्यांनीं हिंदुस्थानाबाबत ब्रिटिश धोरणासंबंधीं महत्त्वाची घोषणा केली.

महायुद्धाचे कालापर्यंतचे आय. सी. एस. परीक्षेचे निकाल पाहिले, तर यशस्वी उमेदवारांत हिंदी उमेदवारांचें प्रमाण शेकडा केवळ सात इतकें पडलेलें आढळतें. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड योजनेनुसार हिंदी उमेदवारांचें प्रमाण शेकडा ३३ असावें आणि तें शेकडा ४८ होईपर्यंत त्यांत दरसाल १½ टक्का वाढ होत जावी असें ठरलें. तथापि, ह्यापुढें सरकारी अधिकाऱ्यांच्या केवळ हिंदीकरणानें हिंदुस्थानांतील लोकांचें समाधान होणें अशक्य होतें; हिंदी अधिकाऱ्यांचे वाट्यास जबाबदारीच्या जागा किती मिळतात हा प्रश्न आतां उपस्थित होऊं लागला. महत्त्वाच्या जागीं युरोपियनांची नेमणूक होते आणि हिंदी अधिकाऱ्यांस योग्य तो पगार मिळाला तरी जबाबदारीच्या जागा मिळत नाहींत, अशी सर्वत्र तक्रार होण्यास प्रारंभ झाला. सेक्रेटरी, जॉइंट सेक्रेटरी, डेप्युटी सेक्रेटरी, इत्यादि महत्त्वाच्या जागा युरोपियनांसाठी राखीवच राहिल्या आणि हिंदी लोकांची त्या जागीं नेमणुका न करण्याची खबरदारी सरकारनें घेतली. १९२३ सालीं ली कमिशनची योजना झाली आणि त्याचेकडे सरकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुकांसंबंधींचा विचार सोपविण्यांत आला. ली कमिशनच्या शिफारसी आणि त्यांमुळें हिंदुस्थानांत उडालेली खळबळ, सायमन कमिशनचा रिपोर्ट, इत्यादि गोष्टी ताज्या असल्यानें त्यांचा विस्तारानें उल्लेख करण्याची आवश्यकता नाहीं. १९३३ सालीं वेगवेगळ्या वरिष्ठ नोकऱ्यांत हिंदी आणि युरोपियन ह्यांची संख्या किती होती हें खालील तक्ता दर्शवितोः—

### हिंदुस्थान सरकारच्या अधिकारांतील वरिष्ठ नोकऱ्या

(१९२३)

| | युरोपियन | हिंदी | एकूण |
|---|---|---|---|
| सिव्हिल | ८१९ | ४७८ | १,२९७ |
| पोलिस | ५०५ | १५२ | ६६५ |
| जंगल | २०३ | ९६ | २९९ |
| इंजिनियरिंग | ३०४ | २९२ | ५९६ |
| मेडिकल ( सिव्हिल ) | २०० | ९८ | २९८ |
| शिक्षण | ९६ | ७९ | १७५ |
| शेतकी | ४६ | ३० | ७६ |
| पशुवैद्यक | २० | २ | २२ |
| | २,१९३ | १,२२७ | ३,४२८ |

म्हणजे, एकूण संख्येपैकी शेकडा ६४ युरोपियन आणि शेकडा ३६ हिंदी होते.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## स्फुट विचार

### इन्कम् टॅक्स बिल

प्राप्तीवरील कराचे बाबतींत मध्यवर्ती असेंब्लीमध्यें कायद्याचा मसुदा चर्चिला जात आहे, त्यावरील सर्वसाधारण स्वरूपाचीं भाषणें पुरीं होऊन त्याच्या तपशीलवार चर्चेस आतां प्रारंभ झाला आहे. सबंद चर्चेचा आढावा घेऊन शेवटीं सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग ह्यांनीं उत्तरादाखल जें भाषण केलें त्यावरून लोकपक्षीय सभासदांच्या सूचना सरकारास मान्य होत नाहींत हें स्पष्ट झालें आहे. दोन लोकपक्षीय महत्वाच्या दुरुस्त्यांस गव्हर्नर जनरल ह्यांची पूर्वमान्यता लागते, ती त्यांनीं नाकारली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. हिंदी लोकांची परदेशांतली प्राप्ती, ती ह्या देशांत आणली जावो अथवा न जावो, सबंद करास प्राप्त होण्याची तजवीज बिलांत केलेली आहे, तिला लोकपक्षाचा विरोध आहे. त्याचप्रमाणें, देशाबाहेरील भांडवल येथें प्राप्ती मिळवीत आहे तिच्यावरील कराचे बाबतींत सवलत देण्यांत येते ती योग्य नाहीं असें लोकपक्षाचें म्हणणें आहे, तें खोडून काढण्याचा सर जेम्स ग्रिग ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रयत्न केला आहे. त्यांचा युक्तिवाद पटण्यासारखा नाहीं, परंतु त्यासंबंधांतली उपसूचना व्हाइसरॉयनीं येऊं देण्यास नकार दिला आहे. हिंदुस्थान सरकार आणि लोकपक्ष ह्यांचेमध्यें अशा रीतीनें तीव्र मतभेद उत्पन्न झाला असून प्राप्तीवरील कराचें बिल असेंब्लीमधून कोणत्या स्वरूपांत बाहेर पडतें इकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

---

### फ्रान्समधील गंभीर परिस्थिति

युरोपांत आणीबाणीचा राजकीय प्रसंग उपस्थित झाल्यानें फ्रेंच सरकारास तातडीचे उपाय योजून राष्ट्राचें संरक्षण करण्याची आवश्यकता भासली आहे. राष्ट्राचें अस्तित्व व सुरक्षितता ह्यांचेवरच संकट आल्यामुळें नाइलाज म्हणून आपण हे उपाय योजीत आहों आणि ते यशस्वी होण्यास सर्व पक्षांनीं स्वार्थत्यागपूर्वक सहाय देणें अगत्याचें आहे असें फ्रेंच प्रधान मंडळाचें म्हणणें आहे. पूर्वीच्या कायद्यानें लोकांस, विशेषतः कामकरी वर्गास, मिळालेल्या सवलती वटहुकुमांच्या जोरावर हिरावून घेण्यांत येत असल्यानें सध्याचें प्रधान मंडळ राज्यकारभार करण्यास अपात्र आहे असें समाजसत्तावाद्यांमधील जहाल गटाचें त्यास उत्तर आहे. आज रोजीं सार्वत्रिक हरताळ पाडून आपला निषेध व्यक्त करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. राज्ययंत्र बंद पाडण्याचा त्यांचा प्रयत्न अयशस्वी करण्याचा निर्धार प्रधान मंडळानें केला आहे. ह्या प्रकारें फ्रान्समध्यें प्रकरण हातघाईवर आलें आहे. मुख्य प्रधानांनीं फ्रेंच जनतेस उद्देशून खालील निर्वाणीचे उद्गार काढले आहेत;—“ आम्हांस सर्वाधिकाराची लालसा नाहीं किंवा दंडुकेशाहीचें राज्य नको आहे. राष्ट्राच्या जीविताच्या संरक्षणाकरितां लोकांनीं स्वार्थत्याग करणें अपरिहार्य झालें आहे. सार्वत्रिक हरताळाचा चाललेला प्रयत्न हें अल्पसंख्याकांनीं बहुजन समाजाची सत्ता नष्ट करण्याविषयीं दिलेलें आव्हानच आहे. ” ह्या गंभीर घोषणेवरून फ्रान्समधली परिस्थिति किती आणीबाणीची आहे ह्याची सहज कल्पना येईल.

---

### सहकारी संस्थांतील कर्जदार आणि जामीनदार

सहकारी पतपेढ्यांत सभासदांस अंगावर परंतु जामीन घेऊन कर्ज देण्यांत येतें. जामीनदारहि पेढीचे सभासद असावे लागतात. सचोटी, काटकसर आणि वेळेवर परतफेड ह्यांचे तत्वावर पेढीचे व्यवहार व्हावयाचे असल्यानें जामीनदारांवर कर्जदारांइतकीच वक्तशीर कर्जफेड होण्याची जबाबदारी टाकण्यांत येते. कर्जाऊ रकमांचा योग्य विनियोग कर्जदार सभासद करीत आहे हें पहाण्याचें काम जामीनदारांचें असतें. पेढीच्या सभासदांनीं एकमेकांवर लक्ष ठेवून काटकसर आणि पैशाचा सदुपयोग करावा हा त्या संस्थेच्या घटनेचा व नियमांचा मुख्य हेतु आहे. ह्या हेतूचा लोकांस विसर पडतो आणि सभासद आपली नैतिक जबाबदारी पार पाडीत नाहींत, हें सहकारी पतपेढ्यांचे व्यवहार अयशस्वी होण्याचें महत्वाचें कारण आहे. सहकारी पेढी ही आपली संस्था आहे, आणि तिचें म्हणजे सर्वांचें हित तें आपलें हित आहे ह्या गोष्टीची जाणीव तिच्या सभासदांत न झाल्यानें व्यक्ति आणि त्यांची संस्था ह्यांच्यामध्यें विरोध उत्पन्न होतो आणि पेढीचा व्यवहार बिघडतो. कर्जदार सभासद कर्जफेडीची अळमटळम करूं लागला असतां त्याचे जामीनदार त्याचेवर वजन पाडीत नाहींत आणि पेढीचा पैसा अडकून पडतो आणि बुडण्याच्या पंथास लागतो. ह्याकरितां पेढीच्या पंचांस जामीनदारांवर कर्जवसुलीसाठी प्रारंभापासूनच इलाज करावा लागतो. मूळ कर्जदाराविरुद्ध करावयाचे सर्व उपाय थकल्यावरच पेढीनें जामीनदारांकडे वळावें असें कित्येक सभासदांनीं सुचविल्यामुळें ह्या बाबतींत जरूर तो पोटनियम पतपेढ्यांनीं मंजूर करावा असें मुंबई सरकारनें ठरवलें आहे. असा नियम वस्तुतः करारांच्या कायद्याच्या विरुद्ध आहे इतकेंच नव्हे तर तो सहकारी तत्त्वाच्या मुळावरच घाव घालणारा आहे. तो तात्त्विक आणि व्यावहारिक दृष्ट्या घातुक आहे. त्याच्या योगानें कर्जें देणाऱ्या पतपेढ्यांचे व्यवहार चालण्यास व्यत्यय येणार असून सहकारी संस्थांच्या कारभारांत आवश्यक असलेली नैतिक जबाबदारी नष्ट होणार आहे. नियोजित पोटनियमाच्या विरुद्ध असलेले भरीव आक्षेप सहकारी खातें आणि सरकार ह्यांच्या नजरेस आणणें अगत्याचें असून त्याकामीं प्रमुख सहकारी संस्थांनीं पुढाकार घेतला पाहिजे.

---

### हिंदी मिठाचा धंदा

मिठाचे हिंदुस्थानांतील उत्पादक आणि एडनमधील उत्पादक ह्यांचेमध्यें तीव्र स्पर्धा आहे. ह्या हिंदी धंद्यास संरक्षण देण्यांत यावें अशी टारिफ बोर्डानें मागें शिफारस केली होती, परंतु त्या संरक्षणाच योजनेंत एडनच्या मिठाचाहि अंतर्भाव झाल्यामुळें हिंदी धंद्यास पुढें येण्यास वाव मिळाला नाहीं. निर्भेळ परदेशी मिठापेक्षा एडनमध्यें उत्पादन होणारें मीठ हिंदुस्थानास जवळचें आहे; म्हणजे एडनमधील धंद्यांत बरेंच हिंदी भांडवल आणि हिंदी मालकी आहे. तथापि, हिंदुस्थानाबाहेर स्थापन करण्यांत आलेल्या धंद्यास प्रत्यक्ष हिंदुस्थानांतच घातुक स्पर्धा करण्यास मोकळीक असणें इष्ट आहे काय ? असा प्रश्न येथें उपस्थित होतो. हिंदुस्थानांतील धंदा हिंदी सरकारास कर भरतो आणि स्थानिक मजुरांस काम मिळवून देतो. एडनसारख्या परठिकाणीं हिंदी भांडवलानें धंदा चालविण्यांत आला, तरी त्याचा पुरा फायदा हिंदी राष्ट्रास मिळत नाहीं. प्रत्यक्ष हिंदुस्थानांत मिठाच्या धंद्यास वाव असतांना त्याची गळचेपी होऊन एडनमधील धंदा उर्जिता-

बस्थेस येणें इष्ट नाहीं. हिंदुस्थानाशीं अनिष्ट स्पर्धा होणार नाहीं असा माल उत्पादन करण्यासाठीं परराष्ट्रांत हिंदी भांडवलाचे सहायानें कारखाने काढण्यांत आले, तर त्यांस अवश्यमेव उत्तेजन देण्यांत यावें, परंतु शंभर टक्के स्वदेशी मालाची खुद्द स्वदेशांतच कुचंबणा होऊं नये हें तत्व अंमलांत येणें आवश्यक आहे. एडनच्या मिठावर जरूर ती जकात तरी बसविण्यांत यावी अगर त्या मिठाच्या कमाल आयातीचा आकडा निश्चित करण्यांत यावा अशी हिंदी मीठवाल्यांची मागणी आहे.

---

### ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका ह्यांचेंमधील करार–हिंदुस्थानची भूमिका

ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका ह्यांचेमध्यें झालेल्या कराराच्या अटी नुकत्याच प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांवरून ओटावा करारानुसार हिंदुस्थानास ज्या सवलती मिळाल्या त्यांत ह्या देशास प्रतिकूल असे कांहीं फेरफार होणार आहेत असें दिसतें. ग्रेट ब्रिटननें हिंदी गव्हास दिलेली सवलत प्रस्तुत करारानें नामशेष होणार असून हिंदी तांदळास मिळणारी सवलतहि कमी होणार आहे. ह्या फेरबदलास हिंदुस्थान सरकारनें संमति दिली असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ह्यासंबंधांत महत्त्वाचा मुद्दा असा आहे, कीं ओटावा करार तात्काळ रद्द करावा अशी मध्यवर्ती असेंब्लीची मागणी असतांहि कराराची अंमलबजावणी चालू आहे आणि त्यामुळें इतर देशांशीं बोलणीं करण्यास हिंदुस्थान सरकारचे हात बांधलेले आहेत. ग्रेट ब्रिटन मात्र ह्या करारांतील अटींत बदल घडवून आणवून इतर राष्ट्रांशीं व्यापारी करार करण्यास मोकळा आहे, इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानासारख्या आपल्या साम्राज्यांतर्गत आश्रित देशांस त्यांच्या फायद्याचीं कलमें सोडून देण्यास तो लावीत आहे. गेल्या कांहीं वर्षांत ग्रेट ब्रिटननें सुमारें वीस करार केलेले आहेत. ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका ह्यांचेमधील करारामुळें हिंदुस्थानावर थोडाफार स्वार्थत्याग करण्याची पाळी येईल; परंतु त्या बाबत हिंदुस्थान सरकारनें बिनसरकारी हिंदी व्यापारी सल्लागार मंडळाचा सल्ला घेतला होता किंवा नाहीं हा प्रश्न महत्त्वाचा आहे. ओटावा करारानें स्वतःस बांधून घेऊन ग्रेट ब्रिटनच्या हितसंबंधाचे वेळीं मात्र हें बंधन शिथिल करण्याचें हिंदुस्थान सरकारचें धोरण कितपत न्याय्य आहे, ह्याचा विचार होणें अगत्याचे आहे.

---

### "सहकारा" वर प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

स्वदेशी व्रतधारी संघाचे विद्यमानें हिंदमाता मंदिरांत प्रो. काळे ह्यांनीं गेल्या आठवड्यांत सहकाराचें स्वरूप आणि त्याची राष्ट्रीय उपयुक्तता ह्या विषयावर व्याख्यान दिलें. व्याख्यानास स्त्रीसमाज मोठा जमला असल्यानें त्यास सहज समजेल अशा सोप्या रीतीनें घरगुती व्यवहारांचे दाखले देऊन काटकसर आणि सहकारी संघटन ह्यांचें महत्त्व त्यांनीं पटवून दिलें.

---

### ह्या अंकाची छपाई

ह्या अंकाची छपाई मेसर्स इंडिया इंक्स अॅन्ड पेंट्स इंडस्ट्रीज लि. ह्यांच्या शाईनें केलेली आहे.

### मिठाचें उत्पादन

जगांतील सर्व देशांमध्यें अमेरिकेचा मिठाच्या उत्पादनाचे बाबतींत पहिला नंबर लागतो. सबंद ब्रिटिश साम्राज्यांत जेवढें मीठ तयार होतें, त्यापेक्षा एकट्या अमेरिकेंत ज्यास्त मिठाचें उत्पादन होतें.

---


## नोटीस.

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें या कंपनीच्या भागीदारांची चौथी वार्षिक साधारण सभा पुणें येथें टिळक स्मारक मंदिरांत रविवार ता. १८ डिसेंबर १९३८ रोजीं दुपारीं ४ वाजतां भरणार आहे.

सभेपुढें येणारीं कामें

१. ता. २० नोव्हेंबर १९३८ पर्यंतचा ताळेबंद व अहवाल मंजूर करणें.

२. सन १९३८-३९ सालाकरितां ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मेहनताना ठरविणें.

३. अध्यक्षांच्या परवानगीनें येणारीं इतर कामें.

४. कंपनीची शेअर "ट्रॅन्सफर रजिस्टर्स" ता. ५ डिसेंबर १९३८ ते ता. २० डिसेंबर १९३८ पर्यंत बंद राहतील.

तरी सर्व भागीदारांनीं सभेस हजर रहावें अशी विनंति आहे.

संचालक मंडळाचे हुकुमावरून,
सी. जी. आगाशे अॅन्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

पुणें, ता. २७-११-३८.

---

छपाईची उत्कृष्ट स्वदेशी शाई
गुणांत व किंमतींत कोणत्याहि परदेशी शाईची स्पर्धा करील अशी

## स्वदेशी शाई वापरा

व

आपली छपाई सुधारा

हिंदी भांडवलदार : हिंदी व्यवस्थापक

## इंडिया इंक्स अॅन्ड पेंट्स इंडस्ट्रीज लि.

वेस्ट एन्ड, खेड (पुणें)

आजच लिहा !

## कॉमनवेल्थ विमा कं. लि.

### वार्षिक अहवाल

पुणें येथील कॉमनवेल्थ विमा कंपनीस ३० एप्रिल, १९३८ अखेर नऊ वर्षे पुरीं झालीं. ह्या अवधीमध्यें कंपनीनें अखंड प्रगति केली असल्याचें दिसून येतें. १९३७-३८ मध्यें कंपनीनें ४० लक्ष, ४० हजार रुपयांच्या पॉलिसी दिल्या, म्हणजे १९३६-३७ च्या मानानें तिच्या कामांत सुमारें २५ टक्क्यांनीं वाढ झाली. ह्या नवव्या वर्षांत कंपनीस हप्त्यांचे रुपानें ६¾ लक्ष रुपये उत्पन्न झालें आणि खर्चाचें प्रमाण उतरत जाऊन तें ३९·१७% वर आलें. वर्ष अखेर विमाखातीं फंडांत ३ लक्ष, ८१ हजार रुपयांची भर पडली. कंपनीकडे ५१ हजारांचे क्लेम दाखल झाले आणि तिनें विमेदारांस ३२½ हजार रुपयांच्या क्लेमचे पैसे दिले. क्लेमची रक्कम तात्काळ मिळविण्यास आवश्यक असणारे कागदपत्र तयार करण्यास कंपनी सहाय देण्यास सदैव तत्पर असल्यामुळें, पैसे लवकर मिळण्यास मदत होते. कंपनीनें पुणें शहरांत नवीन वसाहतीसाठीं सुमारें ५५ हजारांची जागा खरेदी करून ती ११ प्लॉट्समध्यें विभागली आहे. ह्या वसाहतीमध्यें कंपनीनें गुंतविलेल्या रकमेवर ५% तरी व्याज पडत आहे. कंपनीच्या मुख्य कचेरीच्या इमारतीसाठीं तिनें लक्ष्मी रोडवर प्रशस्त जागा घेतली असून तिचेवर बांधकाम चालू आहे. सुमारें १½ लक्ष रुपयांची ही इमारत मे, १९३८ पर्यंत पुरी होईल अशी अपेक्षा आहे.

### मूल्यमापन

कंपनीचें ३०, एप्रिल १९३८ रोजीचें मूल्यमापन तिचे ॲक्चुअरी, श्री. ग. स. मराठे, ह्यांनीं केलें आहे. १९३५ ते १९३८ ह्या मुदतीमध्यें कंपनीस तिच्या विमाखातीं फंडावर दरसाल अनुक्रमें ४·८०%, ५·१२% आणि ५·५५% व्याज पडलें; म्हणजे सरासरी व्याजाचा दर ५ % झाला. कंपनीनें गुंतविलेल्या रकमांवर पडणारा व्याजाचा दर वाढतच असलेला दिसतो, तथापि ॲक्चुअरीनें ४½ % दर गृहीत धरून मूल्यमापन केलें आहे. मूल्यमापनांत २ लक्ष, २१ हजार रुपयांचा आढावा आढळला, त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करावा, असें ॲक्चुअरीनें सुचविलें आहे:—

| | रु. |
|---|---|
| मॅनेजिंग एजंट्स ( २½% ) | ५,५०८ |
| प्रेफरन्स भागांवर गॅरंटीड डिव्हिडंड | ९,००० |
| भागीदारांचा वाटा | १५,४३८ |
| विमेदारांचा वाटा | ११९१,०९९ |
| | २,२१,०४५ |

विमेदारांच्या वाट्यास आलेल्या रकमेंतून हयातींतील आणि हयातीनंतरच्या विम्यास दरसाल दर हजारीं अनुक्रमें १८ आणि १५ रुपये बोनस यावें आणि उतरलेले ४,०२६ रुपये विमेदारांच्या खात्यावर राहूं द्यावे, अशी ॲक्चुअरीची शिफारस आहे.

कंपनीच्या प्रगतीसंबंधीं ॲक्चुअरीनें आपल्या रिपोर्टांत प्रशंसोद्गार काढले आहेत. गेल्या मूल्यमापनाचे वेळीं कंपनीनें दिलेल्या पॉलिसींची संख्या ५,३०० होती; आतां ती ११ हजारांवर गेली आहे. त्याचप्रमाणें विम्यांच्या रकमेंतहि ५९ लाखांपासून १½ कोटि रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. ह्या गोष्टींचा उल्लेख करून ॲक्चुअरीनें हिंदी विमा क्षेत्रांतील कंपनीच्या उच्च स्थानाबद्दल समाधान व्यक्त केलें आहे.

### डायरेक्टरांचा रिपोर्ट

हा मूल्यमापनाचा रिपोर्ट भागीदारांस सादर करतांना, डायरेक्टर बोर्डातर्फे तिचे अध्यक्ष म्हणतात:—"भागीदारांच्या वाटणींतील रकमेंतून ७% दरानें क्युम्युलिटिव्ह डिव्हिडंड ( प्राप्तीवरील कर माफ ) देण्याची शिफारस बोर्ड करीत आहे. उरलेली रकम डिव्हिडंड ईक्वलायझेशन खातीं वर्ग करण्यांत यावी, अशीहि बोर्डाची शिफारस आहे. ॲक्चुअरीच्या रिपोर्टानुसार बोनस वाटण्यांत यावें, अशी बोर्डाची सूचना आहे."

### वार्षिक सभा

कंपनीच्या भागीदारांची वार्षिक सभा ता. ११ डिसेंबर रोजीं ४-३० वाजतां भरणार आहे, तीपुढें मंजुरीसाठीं कंपनीचा ३० एप्रिल, १९३८ अखेरचा वार्षिक अहवाल आणि ताळेबंद व हिशेब हीं ठेवण्यांत येतील. त्यांच दिवशीं ५-३० वाजतां भागीदारांची विशेष साधारण सभा भरेल आणि तिचेपुढें ॲक्चुअरीचा मूल्यमापनाचा रिपोर्ट आणि त्या बाबत बोर्डाच्या शिफारसी ठेवण्यांत येतील आणि विमेदारांस बोनस व भागीदारांस डिव्हिडंड ह्या बाबत मंजुरी घेतली जाईल.

---

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि., धुळें शाखा

ता. ३०-१०-१९३८ रोजीं धुळें येथील म्युनिसिपल हॉलमध्यें बँकेच्या धुळें शाखेखालील सहकारी सोसायट्यांची सभा शाखेच्या १६ व्या वार्षिक सभेनिमित्त भरली होती. सभेस धुळें तालुक्यांतील ३८ सोसायट्यांचे प्रतिनिधी व सहकारी चळवळीची हितचिंतक मंडळी मिळून सुमारें ७५ मंडळी हजर होती. सभेचें अध्यक्षस्थान शाखा-कमिटीचे चेअरमन श्री. यशवंतराव माधवराव पाटील यांनीं स्वीकारलें होतें. शाखेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, ऑडिट मेमो वगैरेचें वाचन होऊन तें मान्य करण्यांत आलें. "बँकेचे लोकप्रिय व वजनदार चेअरमन, सर चुनीलाल मेहता, हे सेवानिवृत्त होत असल्यानें बँकेची व सहकारी चळवळीची हानी होणार आहे; तरी त्यांचा सल्ला हल्लींप्रमाणेंच पुढेंहि प्रत्यक्षाप्रत्यक्ष मिळत राहील" अशी आशा प्रदर्शित करणारा ठराव मंजूर झाला.

शाखा-कमिटीचे सभासद श्री. साहेबराव सदाशिवराव देशमुख यांनीं सहकारी चळवळ व शेतकरी वर्गाची सद्यःपरिस्थिति यासंबंधीं भाषण केलें व सहकारी बंधूंनीं आपली पत राखावी असा उपदेश केला. त्यानंतर धुळें विभागाचे सीनियर इन्स्पेक्टर, श्री. बी. व्ही. हळवे, यांनीं नवीन बिलामुळें शेतकऱ्यांची बाहेरील पत दिवसेंदिवस कमी होत जाईल व त्यांना अवास्तव शर्ती मान्य करून बाहेर कर्ज घ्यावें लागेल. त्यापेक्षा सहकारी चळवळीमध्यें राहून ज्या निरनिराळ्या सवलती खात्याकडून किंवा बँकेकडून मिळत आहेत त्याचा पुरेपूर फायदा घेऊन शेतकरी वर्गानें सोसायट्यांमधील आपली पत वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न करावा अशी कळकळीची विनंती त्यांनीं केली. जिल्ह्यामध्यें कार्य करण्यासाठीं स्थापन झालेल्या पश्चिम खानदेश जिल्हा खरेदी-विक्री संघाला पुरेसें भांडवल असतांना सुद्धां त्याचा शेतकरी वर्गाकडून फायदा घेतला जात नाहीं, हें त्यांनीं जमलेल्या लोकांच्या निदर्शनास आणून शेतीच्या मालाची सहकारितेनें खरेदी-विक्री करणें आर्थिक दृष्ट्या कसें फायद्याचें आहे याबद्दल सोदाहरण माहिती दिली. सहकारी संस्थांना हल्लींच्या बिकट परिस्थितींतून वर येण्यासाठीं बँकेनें विशेष खटपट चालविली आहे तींत बँकेशीं पूर्णपणें सहकार्य करावें अशी विनंती करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. नंतर अध्यक्षांनीं समयोचित समारोप केला.

## एका नमुनेदार खेडेगांवाचें दृश्य

( ले. श्री. का. द. कुलकर्णी, खेड )

[ १ ]

शेतीचे दृष्टीनें हा गांव बराच पुढें गेलेला आहे. शेतीचे कामास प्रथमतः उत्तम जनावरांची चांगली निपज करणें जरूरीचें असतें, हें ओळखून लोकांनीं स्वतःचे पैशांतून चांगल्या प्रकारचा खिल्लारी जातीचा कायमचा बदलता वळू ठेवणेची पद्धत चालू ठेविली आहे. सध्या या गांवानें सरकारी तज्ज्ञामार्फत नवीन वळू बैल खरेदी केला असून त्याचा उपयोग गांवास बराच होत आहे. पांचसात वर्षांपूर्वीपावेतो हेडे लोकांकडून भारी पैशानें बैल खरेदी करणेंची येथें प्रथा दिसून येत होती. परंतु या गोष्टीस गांवचे मंडळींनीं लक्ष घालून कायमचा आळा बसविलेला नजरेस येतो. गांवांतील जमीन भारी मगदुरीची आहे असें म्हणतां येत नाहीं. बागायतहि फारसें नाहीं, तरी सोसायटीमार्फत संघटित योजना करणेचे इरादानें गांवास तालबंधारा सोसायटी स्थापन करणेचे दृष्टीनें वर्गणी जमा करून ठेवी जमा केल्या, व मंजुरीचें प्रकरण पुढें पाठविलें. सहकारी खात्याकडून व शेतकीतज्ज्ञाकडून याबाबत चौकशी होऊन गेली असल्यामुळें ही योजना अमलांत येईल अशी खात्री वाटते. गांवाचे नजीकच नदींत एक मोठा पाण्याचा डोह आहे. त्यावर पंपिंग मशीन बसवून गांवाचा बराच मोठा भाग बागायत होईल अशी योजना आंखली आहे. त्या कामींहि चौकशी चालू आहे.या दोन योजना अंमलांत आल्यास उत्पन्नाच्या दृष्टीनें निश्चित रीत्या भरपूर वाव मिळेल अशी खात्री वाटते. सदर गांवांत जेथें विहिरींचें बागायत आहे तेथें बटाटा, मिरची, भुईमूग, पानमळा, संत्रीमोसंबी, वगैरे पिकें केलीं जातात. सदर गांवाचें मुख्य पीक बटाटा असून डेव्हलपमेंट असोसिएशनमार्फत लोखंडी नांगर, खतें, निवडक बीं व तसेंच प्रत्येक वर्षी इटालियन अगर स्कॉटिश बटाट्याचें बियाणें बऱ्याच मोठ्या प्रमाणांत घेतलें जातें. बाजरी, मिरची, हरभरा, गहूं वगैरे सारखीं पिकें खाण्याच्या कामासाठींच केलीं जातात व बटाटा, कांदा, भुईमूग, पानमळा व फळांच्या बागा हीं पिकें पैशाच्या दृष्टीनें ( Money Crops ) केलीं जातात. एकंदरींत शेतीचीं कामें समाधानकारक चालली असून लोकांना याबाबतच्या अडचणी बऱ्याच दूर करतां आल्या व ते जास्त कार्यक्षम होऊं लागले असें स्पष्ट नजरेस येतें.

पिकांस योग्य बाजारभाव मिळण्याचे दृष्टीनें येथील लोकांनीं भाव येईपर्यंत माल सांठवून ठेवणेची योजना कोठारमार्फत केली आहे. पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनें या लहानशा गांवीं कोठाराची योजना पूर्वी चालू केली होती ती आतां बंद झालेमुळें गांवचे लोकांनीं सहकारी पतपेढ्यांमार्फत सरकारची मंजुरी आणवून योजना चालू केली आहे. खेड, पुणें व मुंबई या ठिकाणीं बटाटा व इतर पिकें बाजारास नेलीं जातात व विक्रीची तजवीज केली जाते.

दुय्यम धंद्याच्या दृष्टीनें हा गांव बराच पुढें येत आहे. गांवानें पोल्ट्री फार्म उघडला असून, लाइव्ह स्टॉक एक्सपर्ट यांचेकडून लेगहॉर्न जातीचे ९ कोंबडे आणले असून त्यांस बक्षीस देणेंत आलेलें आहे. त्यामुळें कोंबड्यांची निपज चांगल्या तऱ्हेची होणेस मदत होत आहे. गांवांस दूधदुभतें बरेंच असून त्यांचेपैकीं कांहीं खेड येथें जातें. दोर ओढणें, कातडी मोटा व इतर शेतीचीं उपकरणें तयार करणें, मुंबई व पुणें येथें जाऊन फळविक्रीचा हंगामी व्यवसाय करणें, इमारती बांधणें, फावल्या वेळांत मोलमजुरी करणें व अशाच प्रकारच्या इतर अनेक गोष्टी हे लोक करीत असतात यामुळें त्यांचे उत्पन्नांतहि थोडी-फार भर पडून प्रापंचिक अडचणी दूर करणेस मदत होते.

शिक्षणाचे बाबतींत हा गांव फारसा पुढें गेलेला नाहीं, तरी परंतु साक्षर लोकांचें प्रमाण लोकसंख्येचे मानानें शेकडा जवळ जवळ २५ पडतें. गांवास मराठी ४ इयत्तेपर्यंत लोकलबोर्डाची शाळा असून त्याशिवाय दर वर्षी हंगाम सोडून सहा महिनेपावेतों प्रौढ इसमांना रात्रीं वर्ग भरवून त्याद्वारें शिक्षण मोफत दिलें जातें. गांवांत एक छोटीशी लायब्ररी असून कांहीं साप्ताहिकें आणि मासिकेंहि त्याशिवाय मागविलीं जातात, त्यांतील उपयुक्त लेख, शेतकीविषयक माहिती इत्यादि निरक्षर लोकांना सामुदायिक रीत्या वाचून दाखविली जाते, व त्याबद्दल साधकबाधक गोष्टींची चर्चा केली जाते. या गांवांत भजनी लोकहि चांगल्या प्रकारचे असून मधून मधून पांडवप्रताप, हरिविजय यांसारखे ग्रंथ वाचून दाखवून त्याचा अर्थहि मंडळींना सांगणेंत येत असतो. ( अपूर्ण )

### आयरिश विमा कंपन्यांचें एकत्रीकरण

आयर्लंडमधील कांहीं प्रमुख आयुर्विमा कंपन्यांचें एकत्रीकरण घडवून आणण्याचें आयरिश सरकारनें योजिलें आहे. आयरिश ॲशुअरन्स लि. ह्या नांवाची एक नवीन कंपनी स्थापून तिचेकडे बाकीच्या कंपन्यांचें काम वर्ग करण्याचा त्या सरकारचा विचार आहे. आपलें काम वर्ग करणाऱ्या कंपनीची जिंदगी तिनें स्वीकारलेल्या मूळ जोखमीपेक्षा जितकी कमी असेल,तेवढी रकम सरकार नवीन कंपनीस देईल. आयरिश ॲशुअरन्स लि. च्या भांडवलाचाहि कांहीं भाग सरकार उचलील. एकत्रीकरणामुळें जुन्या कंपन्यांच्या नोकरांचें होणारें नुकसानहि भरून दिलें जाईल. कोणत्याहि आयुर्विमा कंपनीस नवीन कंपनींत सामील होणें असल्यास, त्याप्रमाणें तिनें अर्ज करावा लागेल. वरील योजना अंतर्भूत करणारें बिल आयरिश पार्लमेंटमध्यें मंजूर झालें, म्हणजे त्याच्या अंमलबजावणीस १४ सप्टेंबरपासून प्रारंभ झाला असें समजण्यांत येईल आणि त्याप्रमाणें व्यवस्था केली जाईल.

### इंग्लंडमधील उच्च रहाणी आणि किफायतशीर व्यवसाय

इंग्लंडमध्यें घरगुती कामासाठीं नोकर मिळणें अत्यंत कठीण जातें, ह्याचें कारण इतर व्यवसायांत अधिक चांगली नोकरी मिळूं शकते हें होय. एका ब्रिटिश लेखकानें आपल्या तीन नोकरांची हकीकत प्रसिद्ध केली आहे, ती उद्बोधक आहे. लेखक म्हणतोः “आमची पहिली मोलकरीण सोडून गेली ह्याचें कारण तिची आई दुसऱ्या एका देशांत एकदम आजारी पडली, हें होय. तिला भेटण्यासाठी जाण्याची मोलकरणीनें इतकी घाई केली कीं विचारूं नका. ती घरची सुस्थितींतील असल्यामुळें तिनें जाण्यासाठी एका खास विमानाची योजना केली. दुसऱ्या मोलकरणीच्या बापास महायुद्धाच्या धामधुमीमध्यें स्वदेशांत परतावें लागलें आणि त्याचे पाठोपाठ मोलकरणीहि गेली. तिनें सर्व्हिसच्या विमानांतून प्रवास केला. तिसऱ्या मोलकरणीनें आपली नोकरी सोडून गेल्यावर कांहीं महिन्यांनीं मला पत्र धाडलें त्यावर क्रॉयडनचा पोस्टाचा शिक्का होता. विमान-वहातुकीचे धंद्यांत तिनें प्रवेश मिळविला होता !”

### प्रवासी आकर्षण्याचा स्वित्सरलंडमधील धंदा

परराष्ट्रांतील प्रवाशांस आपल्या देशाकडे आकर्षून घेऊन त्यांस तेथें पैसे खर्चण्यास लावणें, हा एक माल निर्गत करण्याचा प्रकार आहे. नेहेमींच्या व्यवहारांत परदेशांतील गिऱ्हाइकांकडे माल पोचविण्यांत येतो, येथें मालाकडे गिऱ्हाइक ओढण्यांत येतें. स्वित्सरलंड देशाची सुस्थिति पुष्कळ अंशीं तेथील परराष्ट्रीय प्रवाशांच्या देवघेवींवर अवलंबून आहे. १८४० सालापर्यंत अशा प्रवाशांसाठी तेथें स्वतंत्र हॉटेलें नव्हतीं. १८८० मध्यें १,००२ हॉटेलांतून ५८ हजार प्रवाशांची सोय होईल, इतकी प्रगति झाली आणि ह्या धंद्यांत १० हजार लोकांस काम मिळालें. १९१२ सालीं हॉटेलांची संख्या ३३ हजारांवर गेली, त्यांत १ लक्ष, ६९ हजार उतारूंची रहाण्याची सोय करण्यांत आली आणि ४२ हजार लोक ह्या धंद्यांमध्यें कामास लागले. महायुद्धाचे काळांतील धामधुमीमुळें आणि त्यानंतरच्या आर्थिक मंदीमुळें स्वित्सरलंडमधील प्रवाशांची ये-जा वाढली नाहीं आणि आतां त्या देशांत १ लक्ष, ८५ हजार उतारूंची सोय करणारीं आणि ७४ हजार लोकांस काम देणारीं ७,१८६ हॉटेलें आहेत. १९३८ च्या पहिल्या नऊ महिन्यांत, स्विस हॉटेलांतून उतरलेल्या उतारूंपैकी १५ लक्ष लोक परदेशांतून आले होते. स्वित्सरलंडमधील उद्योगधंद्यांमध्यें किफायतशीरपणाचे बाबतींत उतारूंच्या ह्या धंद्याचा तिसरा अनुक्रम लागतो, आणि त्यापासून स्विस देशास दरसाल सुमारें एक कोटि रुपये नफा मिळतो. इतर कांहीं देशांतील रहाणी स्वित्सरलंडमधील रहाणीपेक्षा स्वस्त असल्यानें ह्या देशाकडे प्रवाशांचा ओढा पूर्वीसारखा राहिलेला नाहीं. परराष्ट्रीय उतारूंस आकर्षित करण्याकरितां स्विस सरकार सर्व तऱ्हेचा यत्न करीत आहे. स्वित्सरलंडमध्यें येणाऱ्या जर्मन प्रवाशांस स्विस सरकार पैसे कर्जाऊ देत असे आणि त्याची परतफेड जर्मनीकडून दगडी कोळसा घेऊन करीत असे. परंतु जर्मनीनें स्वित्सरलंडचें कांहीं देणें बुडविल्यापासून हा व्यवहार बंद झाला आहे.

---

### दि सांगली स्टेट सेंट्रल को. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भाग भांडवल ६१,१२० रुपये असून तिच्या रिझर्व्ह फंडांत ३१ हजार रुपये, बिल्डिंग फंडांत १४,६३३ रुपये, संशयित कर्ज फंडांत ९,३५० रुपये आणि इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत १,३०० रुपये आहेत. बँकेकडील एकूण ३ लक्ष, ८१ हजारांच्या ठेवींपैकी २ लक्ष ३५ हजारांच्या कायम ठेवी आहेत. बँकेनें १ लक्ष, ७१ रुपये सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलेले असून २ लक्ष ७३/४ हजार रुपये सोसायट्यांस कर्जाऊ दिलेले आहेत आणि तिचे ५४३/४ हजार रुपये रोख आणि ५३१/२ हजार रुपये इतर बँकांच्या खात्यांवर शिल्लक आहेत. सोसायट्यांकडून येणें असलेल्या रकमेपैकीं ९१, ९०० रुपये इतकी म्हणजे शेकडा ४३·३ इतकी थकबाकी आहे. गेल्या सालीं थकबाकीचें प्रमाण शेकडा ६६·४ होतें, तें अहवालाचे वर्षी २२·१ नीं कमी झालें, ही गोष्ट समाधानकारक आहे. थकबाकी कमी करण्यासाठी बँक शक्य ते प्रयत्न करीत आहे, आणि त्याबाबत नियम तयार करून योजना आखण्यांत येत आहे. ३१-५-३८ अखेर संपलेल्या वर्षी बँकेस सुमारें ११३/४ हजार रुपये निव्वळ नफा झाला, त्यांत मागील सालचा शिल्लक नफा मिळविला, म्हणजे नफावाटणीसाठी १३,०१९ रुपये रहातात. त्यांतून भागीदारांस ५% दरानें डिव्हिडंड देण्यासाठी ३,०५६ रुपयांचा विनियोग करण्याचें ठरलें. बँकेची वार्षिक साधारण सभा ३० ऑक्टोबर रोजीं भरली होती.

### टांगानिका—ग्रेट ब्रिटनचे हितसंबंध

महायुद्धापूर्वीची जर्मन ईस्ट आफ्रिका म्हणजेच सध्याचा टांगानिका देश होय. ह्या देशाचें क्षेत्रफळ ३ लक्ष, ६० हजार चौरस मैल असून त्यांत ९,१२८ श्वेतवर्णीय आणि ५१३/४ लक्ष तद्देशीय लोक रहातात. म्हणजे, दर चौरस मैलास १४·४ असें वस्तीचें प्रमाण पडतें. आफ्रिकेंतील सर्वांत उंच पर्वत ह्या देशांत आहे. १८८५ सालीं ह्या प्रदेशाचा कांहीं भाग जर्मन सत्तेखालीं प्रथम आला, आणि तेव्हांपासून महायुद्धापर्यंत जर्मनीनें ह्या वसाहतीच्या परराष्ट्रीय व्यापारांत आपलें वर्चस्व कायम राखलें. महायुद्धानंतर टांगानिकाची व्यवस्था पहाण्याचें काम राष्ट्रसंघानें ग्रेट ब्रिटनकडे सोपविलें. पूर्व आफ्रिकेंतील आपली ही वसाहत परत मिळण्याच्या खटपटीस जर्मनीनें प्रारंभ केल्यापासून तिच्याकडे लोकांचें लक्ष वेधलें गेलें आहे. आफ्रिकेंतील ब्रिटिश साम्राज्याच्या दृष्टीनें टांगानिकाचा प्रदेश जर्मनांचे हातीं न जाणें विशेष महत्त्वाचें आहे. उत्तर-ऱ्होडेशिया, युगांडा, केनिया आणि सुडान ह्यांस टांगानिकानें जोडलेलें असून केप ते इजिप्त हा अखंड मार्ग पूर्णपणें ब्रिटिश मुलखांतून जाण्यास मध्यें टांगानिका ओलांडावा लागतो. टांगानिका जर्मनीकडे परत गेल्यानें ब्रिटिश मुलखांच्या सुरक्षिततेस बाध येण्याची भीति आहे.

---

### हिंदी कपाशीच्या निर्गतींत घट

(हजार गाठी)

| कोणत्या देशाकडे | १९३७–३८ | १९३६–३७ |
|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ३६२ | ५९२ |
| जर्मनी | १५५ | २०२ |
| बेल्जम | १४१ | ३३४ |
| फ्रान्स | १२३ | १४३ |
| इटली | ९६ | २२५ |
| जपान | ८१५ | २,४६६ |
| इतर देश | ३६१ | ३४१ |
| एकूण | २,०५३ | ४,३०३ |

हिंदी कपाशीची निर्गत कशी कमी झाली आहे, हें वरील तक्त्यावरून दिसून येईल. १९३८–३९ च्या पहिल्या सहामाहींतील आकडे ह्याच प्रवृत्तीचे निदर्शक आहेत. उतरती निर्गत आणि घसरता बाजारभाव ह्यांचे कचाट्यांत हिंदी कपास सापडली आहे आणि ती पेरणाऱ्या शेतकऱ्यांची दुर्दशा उडाली आहे.

---

### मुंबईच्या परराष्ट्रीय व्यापारांत घट

गेल्या सप्टेंबर महिन्यांत मुंबई बंदरांतून झालेल्या परराष्ट्रीय आयात-निर्गत व्यापाराची किंमत ७ कोटि, ८७ लक्ष रुपये भरली. १९३७ च्या सप्टेंबर महिन्याच्या मानानें ह्या आकड्यांत २ कोटि, १५ लक्ष रुपयांची घट झाली.

### "माशा मारीत" बसण्याचा धंदा

चित्रपटांच्या कार्यालयांत विविध प्रकारांचीं कामें करणारीं माणसें लागतात. त्यांपैकीं कांहींचा उद्योग विचित्र ह्या सदराखालीं येण्यासारखा असतो. हॉलिवुडमध्यें नटनटींच्या कामांत आणि छायाचित्र घेण्यांत माशांनीं त्यांचे भोंवतीं घोंगावून व्यत्यय आणूं नये म्हणून ह्या प्राण्यांचा संहार करण्याचा उद्योग एका माणसाकडे सोंपवलेला असतो. त्यानें सारखें माशा मारीत रहावें लागतें.

### फंडगुंडांच्या फसवेगिरीवर मोहीम

सार्वजनिक हिताच्या आणि लोकोपयोगी दानधर्माच्या नांवावर घरोघर हिंडून पैसे आणि जिन्नस गोळा करणाऱ्या फसव्या लोकांचा इंग्लंडमध्यें सुळसुळाट झाल्याकारणानें अशा कृत्याचें नियंत्रण करण्याचे हेतूनें ब्रिटिश पार्लमेंटांत एक कायद्याचा मसुदा पुढें मांडण्यांत आला आहे. हा कायदा पास झाल्यास पोलिसाच्या खास परवान्यावांचून दारोदार फिरून धर्मादाय गोळा करणारे लोक गुन्हेगार ठरतील. त्यांस प्रोत्साहन देणारी मंडळीहि कायद्याच्या कक्षेंत येतील. ज्यांस दानधर्मासाठी पैसा, कपडे वगैरे लोकांच्या घरीं जाऊन जमवावयाचे असतील त्यांनीं पोलिसाकडे अर्ज करून परवाना मिळवला पाहिजे. चांगली चौकशी करून खात्री पटल्यासच पोलिस परवाना देतील. धार्मिक बुद्धीच्या नागरिकांचें लफंग्यांपासून संरक्षण करण्याची आवश्यकता ग्रेट ब्रिटनमध्यें भासली असून त्यासंबंधांत स्वतंत्र कायदा करण्याचें अगत्य पार्लमेंटला वाटत आहे ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे.

---

### सिंध प्रांताकडे नुकसानभरपाईची मागणी

"सक्कर धरणांतून निघणारा रोहरी कालवा खैरपूर संस्थानांतून ५० मैल वहातो आणि त्यांतील पाण्याच्या उंचीमुळें आणि गतीमुळें कालव्याच्या आजूबाजूच्या प्रदेशांत दलदल झाली आहे. संस्थानांतील ६¾ हजार एकर जमीन शेतीस नालायक होऊन ७० खेड्यांतील घरें पडलीं आहेत" अशी तक्रार खैरपूर संस्थानानें सिंध सरकाराविरुद्ध हिंदुस्थान सरकाराकडे केली आणि १७,१७,०२५ रुपये नुकसानभरपाई मागितली. ह्या तक्रारीचा विचार करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक लवाद कोर्ट नेमलें होतें, त्यानें आपलें चौकशीचें काम नुकतेंच पुरें केलें आहे. नुकसानभरपाईदाखल सिंध सरकारनें खैरपूर संस्थानास १½ लक्ष रुपये अगोदरच देऊन टाकले आहेत.

---

### ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका ह्यांमधील व्यापारी करार

ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका ह्यांचेमध्यें तीन वर्षें मुदतीचा व्यापारी करार नुकताच निश्चित झाला आहे. सुमारें ६०० बाबींत अमेरिकेनें ब्रिटिश व्यापारास सवलती दिल्या आहेत. ब्रिटिश निर्गतीमध्यें बहुतेक सर्व पक्का माल ( कापड, यंत्र सामुग्री, व्हिस्की इ. ) असतो. अमेरिकन निर्गतींत कच्च्या मालाचें प्रमाण मोठें आहे. २५ अश्वशक्तीवरच्या अमेरिकन मोटारींवर ग्रेट ब्रिटन जकात वाढविणार नाहीं, ब्रिटिश साम्राज्यांतील तंबाखूस सध्यापेक्षा अधिक सवलत ग्रेट ब्रिटनमध्यें मिळणार नाहीं, अमेरिकन कपास आणि मका हीं बिगरजकात येत रहातील, इत्यादि अटी अमेरिकेच्या दृष्टीनें फायद्याच्या आहेत. ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहती अमेरिकन व्यापारी कराराचे बाबतींत ग्रेट ब्रिटनचें अनुकरण करतील.

---

### मानसिक व्यथेचा फैलाव

ब्रिटिश हिंदुस्थानांत एकूण वेड्यांचीं इस्पितळें १७ असून त्यांत ८,४२५ रोग्यांची सोय आहे. तथापि, त्यांमध्यें ११,७९२ वेडे ठेवलेले आहेत. इस्पितळांत प्रवेश मिळविण्यासाठी आलेले अनेक अर्ज नाकारावे लागतात आणि कित्येक गुन्हेगार वेड्यांस जागेचे अभावीं कैदखान्यांत ठेवण्याची पाळी येते. इस्पितळांतील निम्म्यापेक्षा अधिक जागा ज्यांची व्यथा बरी होणें शक्य नाहीं अशा वेड्यांनीं व्यापलेली आहे.


FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

THE
POONA SPORTS WORKS
5, Shukrawar, Tulsibag,
POONA.
FRESH STOCK OF
NEW RACKETS JUST ARRIVED.
*Regutting to Customer's Satisfaction.*
We have a Reputation to Maintain!
*Prop* : S. R. Tulsibagwale.

दि बँक ऑफ महाराष्ट्र,
लिमिटेड.
लक्ष्मीरोड, पुणें शहर.
अधिकृत भांडवल........रु. १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल........रु. २,४४,६००
वसूल झालेलें भांडवल...रु. १,२२,३००
शाखा
अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.
डायरेक्टर्स
प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.
बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
एम. व्ही. गोखले, मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११६—१ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०२—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—५ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९८—६½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०५—५ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९९—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( विगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाव

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४८–८–० |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% ... ... | ११६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | २९–१४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७६—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२३—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १७०–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३०७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १३३५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०३—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १२½% | ९४२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७३२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८३—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४१—४ |
| सिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—१ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१०–१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६०—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | ३१९—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १५४५–० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | १०८–१२ |

६ टक्के मासिक आंवक ठेव
डॉन ऑफ इंडियाच्या नवील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.
जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

'अभिनंदनीय प्रगति' अनेक थोर नागरिक ह्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. 'मॅनेजिंग डायरेक्टर

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व वर्फी वापरा
मोती चौक : : : सातारा

दि प्रॉव्हिन्शिअल बँक
ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६
मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड ( सी. अॅण्ड. अेम् स्टेशन ) बंगलूर
शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, गुत्त.
अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल.सी
मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.
करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् : १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होत न आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् : ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीही वेळां पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.
कायम मुदतीच्या ठेवी : दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतींच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. या संबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.
अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यांवर हातउसन्या रकमा मिळतात. सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.
अधिक माहिती मागवावी.
एम्. मोहन, एजंट, १० मेनस्ट्रीट, पुणें.
एच. जी. गद्रे, एजंट लक्ष्मीरोड, पुणें. २

अप-टु-डेट शिलाई करतां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

## पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )


येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**पाहिजेत !** खालील सुप्रसिद्ध विमा कंपनीकिरितां **महाराष्ट्रांत व कर्नाटकांत** कांहीं ऑर्गनायझर व एजन्टस् पगारी कमिशनवर नेमणे आहेत.

## दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा — चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चांसह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

व्ही. व्ही. ॲन्ड को०
जंपर स्पेशालिस्ट
लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,
८ निहाल पेठ (मुदलीयार रोड), पुणें शहर

पूर्वींची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें
**द. म. द. शें. ०४ चार आणे व्याजानें**
**व**
**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**
देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस् व एजन्सीसाठीं ०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.
**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**
हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २

## ☞ फर्म, कंपनी आणि सोसायटी

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं सातारचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "**न्यायबोध**" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा.व. ट.ख. सह फक्त ५ रु नमुना अंकासाठी सात आण्यांचीं तिकीटें पाठवा.

मॅनेजर,
"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.

# K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.